# संत ज्यूडची भक्ती

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे. आमेन

धर्मगुरु : हे प्रभू तू या जगात असताना आपल्या पित्याशी कळवळीने प्रार्थना केलीस. आम्ही आता करीत असलेली प्रार्थना तू ऐक

तुझी आई पवित्र मरीया आणि संकट ग्रस्ताना आधार देणारा तुझा चुलत भाऊ संत ज्युड याच्या व्दारे आम्ही ही विनंती तुला करतो. त्यांचा मध्यस्तीने आमच्या प्रार्थना स्वीकार व त्या फलदायी कर.

## श्रध्दावंताच्या प्रार्थना

प्रमुख : हे संत ज्युड, तू निराशग्रस्तांचा आधार आहेस. तू स्वत : सर्व प्रकारची संकटे सहन केलीस आणि आपल्या विश्वासाठी प्राणही अर्पण केलास. आमची श्रध्दा तुझ्या प्रमाणे बळकट कर.

सर्व : संत ज्यूड, आमच्यासाठी विनंती कर.

प्रमुख : हे संत ज्युड, आपल्या विशवासाठी तू प्राणाची पर्वा केली नाहीस आम्ही देवाशी आणि ख्रिस्त सभेशी प्रामाणिक रहावे आणि आमची कर्तव्ये पार पाडावीत म्हणून आम्हाला मदत कर

सर्व : संत ज्युड, आमच्यासाठी विनंती कर.

प्रमुख : है संत ज्युड, परमेश्वराला संतुष्ट करणे हेच तुझ्या जीवनाचे ध्वेय होते. आमच्या मनात देवाविषयी कळकळ निर्माण कर म्हणजे संकटांनी शुध्द झाल्यावर आम्हाला देवाच्या राज्यात शाश्वत जीवनाचा मुकूट मिळेल.

सर्व : संत ज्युड, आमच्यासाठी विनंती कर.

धर्मगुरु : हें परमेश्वरा, तू ज्यूडच्याव्दारे आम्हाला तुझ्या नावाची ओळख करुन दिली आहेस. आम्ही आमच्या जीवनात सदगुणांची जोपासना आणि संताचा आदर्श डोळयासमोर ठेवून अधिकाधिक पवित्र व्हावे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताव्दारे करतो. आमेन.

## संत ज्यूडकडे प्रार्थना

(सर्वांनी एकत्र)

हे संत ज्युड, भाग्यवंत प्रेषिता, तू प्रभू ख्रिस्ताचा निष्ठावंत सेवक आणि मित्र होतास, तू निराशग्रस्तांचा आधार आहेस म्हणून ख्रिस्तसभा तुझा गौरव करते. मी तुझा एक दीन भक्त आहे. तुझ्या शक्तीशाली मध्यस्तीने माझी गरज पूरी कर. या मोठया संकटाच्या प्रसंगी माझ्या मदतीला धाव म्हणजे मी तुझया समवेत सदासर्वकाळ परमेशवराचा गौरव करीन.

(आपला हेतू व गरज सांगावी)

# संत ज्यूडची भक्ती

हे भाग्यवंत संत ज्यूड मी तुला वचन देतो की तुझ्या औदार्याची मी सतत आठवण ठेवून माझा खास आश्रयदाता संत म्हणून तुझा मी नेहमी सन्मान करीन. त्याचप्रमाणे तुझयावरील लोकांची भक्ती जास्त न जास्त वाढत जावी म्हणून माझ्या परीने प्रयत्न करीन.

## विनंती गाला

(खाजगी प्रार्थनेसाठी)

| | |
|---|---|
| संत ज्यूड, प्रभू येशुच्या नातलगा | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| संत ज्यूड, प्रभू खिस्ताच्या सहवासात राहिलेल्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, प्रभू येशुच्या प्रामाणिक शिष्यवरा | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, प्रभू ख्रिस्ताकडून पाय धुण्याचे भाग्य लाभलेल्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, पुनरुत्थित ख्रिस्ताचे दर्शन घडलेल्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, पर्शिया देशात सुवार्ता गाजविणाऱ्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, लोकांना श्रध्देची ओळख करुन देणाऱ्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, पवित्र आत्म्याच्या सहाय्याने चमत्कार घडविणाऱ्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, भूताखेताची हाकलपट्टी करणाऱ्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |
| हे संत ज्यूड, ख्रिस्तासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या | आम्हासाठी प्रार्थना कर. |

## आशिर्वादांची प्रार्थना

धर्मगुरु : प्रभू तुम्हा बरोबर असो.

सर्व : आणि तुम्हा बरोबर सुध्दा

हे सर्व शक्तीमान सनातन परमेश्वरा, तुझ्यावर श्रध्दा ठेवणाय्यास तू आरोग्य दे. आम्ही आजऱ्यासाठी करीत असलेली प्रार्थना ऐक. आजाऱ्यांना बरे कर. म्हणजे रोगातून मुक्त झाल्यावर ते ख्रिस्ताव्दारे ख्रिस्त सभेत प्रभू आभार मानतील.

हे मरीयेच्या पुत्रा, प्रभु येशु ख्रिस्ता, संत ज्यूडव्दारे आम्ही करीत असलेली प्रार्थना ऐकून घे, आणि आम्हाला त्याच्याव्दारे तुझ्या कृपेने वरदान दे. आमेन.

सर्वसमर्थ परमेश्वर, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा तुम्हास संत ज्यूडच्या मध्यस्थीने आशिशर्वाद देवो.

आमेन.